'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN :2348-7143 (Online)
Vol. 2 Issue. 1 | Jan.- March - 2015

# शासनाची जनधन योजना व बँकांची कसोटी

**प्रा. डॉ. ए. डी. गोस्वामी,**
**अर्थशास्त्र विभाग,**
**भुसावळ कला विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय,**
**भुसावळ, जि. जळगाव, महाराष्ट्र, भारत.**

***सरकारची जनधन ही योजना उत्कृष्टपणे आखलेली कल्पक योजना आहे. प्रत्येक योजनेमागे एक ठराविक ब्ल्यूप्रिंट असते, त्यानुसार योजना राबविण्याचे कार्य एका विशिष्ट मार्गाने करण्यात येत असते. जनधन योजने बाबत देशातील सर्व प्रदेशातून मोठया प्रमाणावर पाठिंबा मिळत असून थक्क करणारी आकडेवारी जाहीर होत आहे. परंतु ही जनधन योजना राबवितांना बँकांची एक कसोटी लागेल यात शंका नाही.***

**प्रास्ताविक**

भारतीय अर्थव्यवस्था जागतिकी करणामुळे आंतरराष्ट्रीय बाजार व्यवस्थेशी निगडित असल्याने सरकार विविध मार्गांनी निधी मिळविण्याचा व निधीचा वापर योग्य होण्यासाठी विविध योजना जाहीर करीत आहे परंतु सरकार ज्या वेगाने योजना जाहीर करत असतात त्या वेगाने त्यांच्याकडे निधी येत नसतो.अर्थव्यवस्थेतील एका महत्वाच्या असलेल्या बँकिंग क्षेत्रामार्फत विविध योजना राबविण्याचे कार्य शासन करीत असतात. 1969 मध्ये बँक राष्ट्रीयकरणामुळे

एका महत्वाकांक्षी योजनेला सुरूवात झाली. देशातील श्रीमंत वर्ग, ठराविक उच्चभ्रू व्यक्ती आणि मोठया उद्योगधंद्यापुरती मर्यादित असलेली बँकिंग व्यवस्था सामान्य जनते पर्यंत पाहेचवण्याचे शिवधनुष्य केंद्रसरकारने उचलले होते आज 45 वर्षांनी ` जनधन ` या योजनेच्या स्वरूपात महत्वाकांक्षी योजना सरकारकडून 15 ऑगस्ट 2014 रोजी लाल किल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी योनी जाहीर केली. देशातल्या सगळया बँकांमध्ये 12.5 कोटी नो-फ्रिल अकाऊ ंट उघडले गेले. शासनाचे पहिल्या वर्षी 7.5 कोटी खाती उघडण्याचे उद्दिष्ट असतांना त्यापेक्षा अधिक खाती उघडली गेली परंतु बँकांची आणि सरकारची खरी कसोटी जनधन योजनेत खातेदारांचे खाते उघडल्यावर त्यांना सुविधा कशा पुरविता येईल आणि योग्य प्रद्धतीने खाते कसे सांभाळता येईल यावर अवलंबून असणार आहे तसे त्वरीत केल्यास योजना यशस्वी होण्यास मदत होईल. आर. बी. आय. चे गव्हर्नर डॉ. रघुरामराजन यांनी ` जनधन ` बाबत बँकांना वेळीच सावध केलेले आहे.

**उद्दिष्टे -**

1) जनधन योजनेच्या स्वरूपाविषयी अभ्यास करणे

2) जनधन योजना राबवितांना बँकिंग क्षेत्राच्या कसोटीचा अभ्यास करणे

सरकारची जनधन ही योजना उत्कृष्टपणे आखलेली कल्पक योजना आहे. प्रत्येक योजनेमागे एक ठराविक ब्ल्यूप्रिंट असते, त्यानुसार योजना राबविण्याचे कार्य एका विशिष्ट मार्गाने करण्यात येत असते. जनधन योजने बाबत देशातील सर्व प्रदेशातून मोठया प्रमाणावर पाठिंबा मिळत असून थक्क करणारी आकडेवारी जाहीर होत आहे. परंतु ही

जनधन योजना राबवितांना बँकांची एक कसोटी लागेल यात शंका नाही. यासंबंधी खालील काही बाबींचा उल्लेख करणे आवश्यक आहे -

1) जनधन योजनेत अशा कुटुंबांचे खाते उघडले जातेय ज्यांचे कुठल्याही बँकेत खाते नही परंतु याबाबतीत आपल्याकडे अशी यंत्रणाच नाही कि ज्याने आपण एका व्यक्तिचे ठराविक बँक सोडून दुसरीकडे कुठे खाते आहे की नाही याची पडताळणी करता येईल. त्यामुळे शून्य शिल्लक रकमेवर खात्यांची संख्या बँकांमध्ये वाढण्याची शक्यता आहे. आणि असा डुप्लिकेशनचा त्रास काही दशकं तसाच राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) बँकाना ही खाती उघडण्यासाठी आणि डेबिट कार्ड छापून ते वितरीत करण्यासाठी प्रत्येक खात्यामागे रूपये 120 खर्च येत आहे आणि आता पर्यंत सर्व खाती उघडण्यात सुमारे 2000 कोटी खर्च झाले आहेत. या पैशाचा भार सरकारला आणि बँकांना उचलावा लागणार आहे.

3) जनधन योजनेच्या अंतर्गत उघडण्यात आलेल्या खात्यांमध्ये काही दिवसापूर्वी जाहीर
झालेल्या आकडेवारीनुसार 74 % खात्यात काहीच रक्कम शिल्लक नाही ( झीरो बॅलन्स) किंवा उघडल्यानंतर कुठलाही व्यवहार करण्यात आलेला नाही. सर्वच खातेदार आर्थीकसहाय्या मार्फत ( सबसिडी ) वितरीत होणाऱ्या पैशांची वाट पहाताहेत. याबाबतीत एक योजनेची सकारात्मक बाब म्हणजे 30 जानेवारी 2015 पर्यंत 26 % खात्यात सुमारे 10,000 कोटी ( दहा हजार कोटी ) जमा झालेले आहेत. आणि ही रक्कम सामान्य भारतीयांची कष्टाची मिळकत आहे असे मानायला हरकत नही.

4) जनधन योजने अंतर्गत बँकेत खाते उघडतांना ओळखपत्र आणि रहिवासाचा पुरावा म्हणून जमा करण्यात आलेल्या पुराव्यांची सत्यता पडताळूनच खाते उघडण्याचे आवाहन करण्यात आले आहे तरीसुद्धा जनधन योजनेचा फायदा उचलत समाजातील काही घटक ' हवाला ' किंवा ' मनी लँडरिंग ' सारखे प्रकार घडवून आणण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) सध्या आपल्या देशात जवळपास 1,00,000 बँक शाखा आणि 1,75,000 एटीएम आहेत. परंतु एका सर्वेक्षणानुसार जनधन योजनेची संपूर्ण अंमलबजावणी झाल्यावर आपल्याला पुढील 15 ते 20 वर्षात 3,50,000 बँक शाखा आणि 4,00,000 हून अधिक एटीएम अर्थान्वीत करावे लागतील. याबबतीत एकटया बँकिंग क्षेत्राला अब्जावधीची गुंतवणूक झेपणार आहे का ? आणि एवढी गुंतवणूक केली तरी त्यातून नफा कसा कमवावा हा एक मोठा प्रश्न बँके समोर निर्माण होवू शकतो.

6) जनधन योजने अंतर्गत उघडण्यात आलेल्या बँक खाते दारांना एक लाख रूपयांचा विमा देण्यात येणार आहे. हा विमा योजनेचा प्रिमियम कोण देणार यावरून केंद्र सरकार आणि विम्याची जबाबदारी पेलणाऱ्या एल. आय. सी. मध्ये अनेक वाद चालू आहेत. सरकारच्या अधिकार क्षेत्रात एल.आय.सी. असल्याने हा प्रश्न भविष्यात

सुटण्याची शक्यता करायला हरकत नाही परंतु आकस्मिक संकटे निर्माण झाली तर अशा खातेदाराला प्रत्यक्ष रक्कम द्यावीच लागेल हे सुद्धा नाकरता येत नही. हे विमा सरंक्षण कुटुंबातल्या प्रमुख व्यक्तीलाच मिळणार आहे.

विमा संरक्षण मिळण्यासाठी एकत्र कुटुंब पद्धतीनुसार तीन ते चार कुटुंब एकत्र राहत आहेत अशा कुटुंबाचा प्रमुख एकच असतो. परंतु या योजनेनुसार एकत्र कुटुंबातील प्रत्येक कुटुंब संरक्षण मिळण्यासाठी वेगवेगळे तीन ते चार खाती उघडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) जनधन अंतर्गत सर्वात आकर्षक बाबीची सर्वच खातेदार आतुरतेने वाट पाहत आहे ती म्हणजे खाते उघडून 6 महीने व्यवस्थित हाताळल्यानंतर त्यात 5000/-( रूपये पाच हजार मात्र) रूपयांचा ओव्हर ड्राफ्ट ( लघुकर्ज ) बँकेच्या नियमानुसार शाखा व्यवस्थापकांच्या परवानगीनंतर मिळणार आहे. ही सुविधा प्रामुख्याने त्या कुटुंबातील स्त्रीला देण्याचे आदेश बँकांना आहेत. कर्ज दिल्या नंतर समजा परतफेड नाही झाली तर त्यास जबाबदार कोण याचे उत्तर आज तरी कोणाकडेही नही. कर्ज देतांना एक तरी वस्तू तारण घेणाऱ्या बँका नुसत खात व्यवस्थित चालवल्यावर ओव्हरड्राफ्ट कसा देणार आणि ओव्हरड्राफ्ट दिल्यास त्याची परतफेड होत नाही हे कळत असतांना त्याची वसुली बँकांसाठी एक आव्हानच ठरू शकते. आज मोठया उद्योगपतींनी मोठया रकमेचे कर्ज बुडवणाऱ्यासमोर हतबल झालेल्या बँका सर्वसामान्य व्यक्तींना या योजने अंतर्गत देण्यात आलेले कर्ज बुडाले तर काय करतील या बाबत गंभीर विचार होणे आवश्यक आहे.

8) जनधन योजनेत आधार कार्डाला अनन्यसाधारण महत्व आहे. नुसत्या आधार कार्डाची प्रत जोडून सुद्धा खाते उघडता येते परंतु आधार योजनाच आता कुठे रूळावर येत आहे. त्यात बँकांना ' केवायसी ' म्हणून बंधनकारक ठेवण पटत नाही मागील दोन वर्षात कित्येकदा खोटी आधार कार्ड वाटप केंद्रे पकडण्यात आली होती. त्यावर उपाय म्हणजे खाते उघडण्यापूर्वी आधार क्रमांकांचे ' ई - व्हेरिफिकेशन ' करण्याची सक्ती केली आहे परंतु मागील काही वर्षात बँकिंग क्षेत्रत असलेला कर्मचारी वर्ग अत्यंत कमी आहे. म्हणजेच अपुरे मनुष्यबळ आणि योजना राबविण्यासाठी लागणारी सुसज्ज यंत्रणा यांचा अभाव याचा गांभिर्याने विचार केलेला दिसून येत नही.

जनधन योजनेला देशातून मोठया प्रमाणावर नागरिकांचा प्रतिसाद मिळाला आहे. या खात्यामार्फत केंद्रिय अर्थमंत्र्यांनी विविध योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या सबसिडी त्यांच्या या खात्यात जमा करण्यासंदर्भात माहिती दिली आहे तसेच या खातेदाराला विमा संरक्षण, ओव्हरड्राफ्ट यासारख्या सवलती देण्या बाबत सुद्धा माहिती देण्यात आली आहे. शासनाकडून देण्यात येणाऱ्या सवलती थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करणे शक्य होईल त्याचप्रमाणे ज्या नागरिकांचे कुटुंबाचे खाते बँकेत नव्हते अशा कुटुंबांनी बँकेत खाते उघडल्याने

त्यांना बँकिंग पद्धतीविषयी योग्य माहिती होईल आणि त्यांनी त्यांचकडील थोडीफार असलेली बचत सदर खात्यात भरणा केली तर देशाच्या आर्थीक विकासासाठी सदर रकमेचा उपयोग होईल यात शंका नाही. परंतु जनधन योजना राबविणाऱ्या बँकिंग क्षेत्राला वेळोवेळी सर्व सुविधा निर्माण करून देणे अत्यंत आवश्यक आहे.

**निष्कर्ष -**

जनधन योजना शासनाकडून आखण्यात आलेली कल्पक योजना आहे. संपूर्णपणे कार्यान्वीत झाल्यास जगातल्या कुठल्याही देशापेक्षा मोठी गैरकागदी अर्थव्यवस्था निर्माण करू शकते. जनधन योजना यशस्वीपणे राबविण्यात यश आल्यास जनधन योजनेचा दुसरा टप्पा अनेक छोटया बँका स्थापनेत आणि मोबाईल द्वारे पैशांचे व्यवहार करण्यासाठी होईल परंतु जनधन योजना पहिल्या टप्प्यात वरीलप्रमाणे बँकांची आणि सरकारची खरी कसोटी खातेदाराचे खाते उघडल्यावर त्यांना सुविधा कशी पुरवता येईल आणि योग्य पद्धतीने खाते कसे सांभाळता येईल यावर अवलंबून असणार आहे. शासनाकडून मिळणाऱ्या अनेक सबसिडी रक्कम व इतर सवलती बाबतच्या कार्यासाठी बँकांमध्ये पूरेसे मनुष्यबळ, सुसज्ज यंत्रणा, ई-व्हेरिफिकेशन सुविधा बाबत शासनाकडून योग्य नियम तयार करून पारदर्शकता आणण्याची गरज असल्याचे दिसून येते.

---

**संदर्भ :-**

1. विविध वर्तमानपत्रात आलेली माहिती